# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.11.2025** **वारःबुधवार**

---

1. जलस्रोतांच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचं राष्ट्रपतींचं आवाहन, राष्ट्रीय जल पुरस्कारांमधे सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून महाराष्ट्राचा गौरव
2. नऊ कोटी शेतकऱ्यांना पीएम-किसान योजनेचा एकविसावा हप्ता आज वितरित होणार
3. जंगली श्वापदांचे हल्ले आणि भाताचं पिक जलमय झाल्यानं होणारं नुकसान पिक विमा योजनेखाली संरक्षित
4. कृत्रिम बुद्धिमत्तेवरील मोफत राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आरंभ
5. दहशतवादाविरुद्ध आपल्या नागरिकांचं रक्षण करण्याचा भारताचा अधिकार अबाधित असल्याचं परराष्ट्र मंत्र्यांचं ठाम प्रतिपादन आणि
6. मूकबधीरांच्या ऑलिंपिक्समध्ये 10 मीटर एअर रायफल मिश्र सांघिक स्पर्धेत भारतीय नेमबाजांची दुहेरी कामगिरी

**जल-पुरस्कार**

हवामान बदलाचा जलस्रोतांवर परिणाम होत असून, जलस्रोतांच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावं, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. राष्ट्रपतींच्या हस्ते 2024 या वर्षासाठीचे राष्ट्रीय जल पुरस्कार काल नवी दिल्लीत प्रदान करण्यात आले; त्यावेळी त्या बोलत होत्या. या सोहळ्यात महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्य विभागात प्रथम पुरस्कारानं गौरवण्यात आलं. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक स्वराज्य संस्था विभागात नवी मुंबई महानगरपालिकेनं प्रथम पुरस्कार पटकावला. नाशिक जिल्ह्यातील कनिफनाथ जल वापर सहकारी संस्थेला 'सर्वोत्कृष्ट जलवापरकर्ता संस्था' हा दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. राज्य सरकारनं राबवलेल्या जलव्यवस्थापन धोरणांचा आणि शेतकरी, पाणी वापर संस्था तसंच प्रत्येक नागरिकाच्या सक्रिय सहभागाचा हा विजय आहे, अशी भावना विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त केली. या कार्यक्रमाला केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील, जलशक्ती राज्यमंत्री व्ही. सोमन्ना आणि राजभूषण चौधरी उपस्थित होते.

**पंतप्रधान-कोइम्बतूर भेट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज तमिळनाडुतील कोइम्बतूर इथं दक्षिण भारत नैसर्गिक शेती शिखर परिषदेचं उद्घाटन करतील. सेंद्रिय शेतकरी दिवंगत नम्मलवार यांनी राबविलेल्या नैसर्गिक शेती पद्धतींचं प्रदर्शन करण्याचा या शिखर परिषदेचा उद्देश आहे. पंतप्रधान नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांशी यावेळी संवाद साधतील. 9 कोटी शेतकऱ्यांसाठी 18 हजार कोटी रुपयांचा एकविसावा पीएम-किसान हप्ता देखील त्यांच्या हस्ते वितरित करण्यात येईल.

**पिकहानी**

वन्य प्राण्यांचे हल्ले आणि भाताच्या शेतीत पाणी साठल्यानं होणारं नुकसान आता प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत संरक्षित केलं जाईल. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळं होणारं पीक नुकसान आता स्थानिक जोखीम श्रेणी अंतर्गत पाचवं अतिरिक्त कवच म्हणून ओळखलं जाईल, तर भातशेतीचं पाण्यामुळं होणारं नुकसान स्थानिक आपत्ती अंतर्गत पुन्हा सुरू केलं जाईल असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं सांगितलं. पिकांचं नुकसान करणाऱ्या वन्य प्राण्यांची यादी राज्यांद्वारे प्रकाशित केली जाईल. हा निर्णय

पुढील वर्षी खरीप हंगामापासून लागू केला जाईल. वर्षानुवर्षे, देशभरातील शेतकऱ्यांना हत्ती, रानडुक्कर, नीलगाय, हरीण आणि वानर यांसारख्या वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमुळं वाढत्या प्रमाणात पिकांचं नुकसान सहन करावं लागत आहे. तसंच पूरप्रवण आणि किनारी राज्यांमधील भातशेती करणाऱ्या शेतकऱ्यांचं मुसळधार पाऊस आणि शेतात पाणी भरल्यामुळं नुकसान होत असतं. या कवचामुळं मानव-वन्यजीव संघर्ष जास्त असलेल्या महाराष्ट्रासह ठराविक राज्यांमधील शेतकऱ्यांना लक्षणीय फायदा होण्याची अपेक्षा आहे.

**युवा-एआय**

सर्वांना कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी ज्ञान होण्याच्या उद्देशानं YUVA AI for ALL हा एक मोफत राष्ट्रीय अभ्यासक्रम केंद्र सरकारनं सुरू केला आहे. पूर्णपणे मोफत, साडेचार तासांचा हा राष्ट्रीय अभ्यासक्रम असल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालयानं सांगितलं. हा अभ्यासक्रम फ्युचरस्किल्स प्राइम, आयजीओटी कर्मयोगी आणि अनेक लोकप्रिय शैक्षणिक पोर्टलसह विविध मंचांवर उपलब्ध आहे आणि तो पूर्ण करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला भारत सरकारचं अधिकृत प्रमाणपत्र मिळेल. इंडियाएआय मिशन अंतर्गत तंत्रज्ञानाचा नैतिक, जबाबदार आणि समावेशक अवलंब करण्यास प्रोत्साहन देत एक कोटी नागरिकांना कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक मूलभूत कौशल्यांनी सक्षम करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

**सनसनाटी**

लाल किल्ला कार बॉम्बस्फोटाच्या घटनेशी संबंधित संवेदनशील माहितीच्या प्रसारणाबाबत माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं सर्व खासगी उपग्रह वाहिन्यांसाठी सूचना प्रकाशितली आहे. काही वृत्तवाहिन्या या प्रकरणात सहभागी असलेल्या कथित व्यक्तींबाबत सामग्री प्रसारित करत आहेत, त्यांच्या हिंसाचाराचं समर्थन करत आहेत, तसंच स्फोटक सामग्री कशी बनवायची याबद्दल माहिती देत आहेत. अशा प्रसारकांनी केबल टेलिव्हिजन नेटवर्क्स (नियमन) कायदा, 1995 अंतर्गत कार्यक्रम आणि जाहिरात संहितेचं काटेकोर पालन करावं अशी सक्त सूचना मंत्रालयानं दिली आहे.

**जयशंकर**

भारताला आपल्या नागरिकांचं दहशतवादापासून रक्षण करण्याचा अधिकार आहे आणि हा अधिकार तो बजावेल असं ठाम प्रतिपादन परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी केलं आहे. रशियातील मॉस्को इथं झालेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या सरकार प्रमुखांच्या परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते. जगानं सर्व प्रकारचा दहशतवाद जराही सहन करता कामा नये असं सांगून जयशंकर म्हणाले की, हवामान बदल, साथीचे रोग आणि संघर्षांनी भरलेल्या या युगात मानवतावादी सहकार्य महत्त्वाचं आहे. लोकांमधील देवाणघेवाण कोणत्याही खऱ्या नात्याचा गाभा आहे असा भारताचा असा ठाम विश्वास आहे. शांघाय सहकार्य संघटनेनं बदलत्या जागतिक परिस्थितीशी जुळवून घेत व्यापक कृती कार्यक्रम विकसित केला पाहिजे, कार्यपद्धतींमध्ये सुधारणा केल्या पाहिजेत अशी अपेक्षा जयशंकर यांनी व्यक्त केली.

**व्यापार मेळा**

नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं सुरू असलेला 44 वा भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा आजपासून सर्वसामान्य लोकांसाठी उघडणार आहे. 'एक भारत-श्रेष्ठ भारत' अशी यावर्षीच्या मेळ्याची मध्यवर्ती सकंल्पना आहे. उत्तर प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र आणि बिहार ही भागीदार राज्यं आहेत, तर झारखंड केंद्रस्थानी आहे. या मेळ्यात 30 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेश आणि 60 हून अधिक मंत्रालयं सहभागी होत आहेत. भारतीय व्यापार प्रोत्साहन संघटनेचे प्रशासन महाव्यवस्थापक शंकरा नंद भारती यांनी आकाशवाणीला सांगितलं की, पर्यटकांच्या सोयीसाठी मेळ्यात विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

**सूक्ष्मजीव-रोधक**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांनी अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्सवरील राष्ट्रीय कृती योजनेच्या दुसऱ्या आवृत्तीचा काल नवी दिल्लीत आरंभ केला. एएमआरमुळे, विशेषतः शस्त्रक्रिया प्रक्रिया, कर्करोग उपचार आणि इतर गंभीर

आरोग्यसेवा हस्तक्षेपांमध्ये लक्षणीय धोके निर्माण होतात. प्रतिजैविकांचा अतिवापर आणि गैरवापर दुर्दैवानं सामान्य प्रथा बनली असल्याचं नड्डा यांनी नमूद केलं.

अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्सला गंभीर आरोग्य, राजकीय आणि आर्थिक परिणामांसह जागतिक आरोग्य धोका मानलं गेलं आहे. एएमआरमुळे उपचारांमध्ये विलंब होतो, परिणामी प्रतिरोधक सूक्ष्मजीवांचा प्रसार आणि आरोग्य-सेवा खर्च आणि कुटुंबं आणि समाजांवर आर्थिक भार वाढण्याचा धोका वाढतो.

**<u>बिहार-नेता</u>**

बिहारमध्ये एनडीएचे नवनिर्वाचित आमदार आज पाटणा इथं आपला नेता निवडण्यासाठी बैठक घेणार आहेत. भाजप, जनता दल (संयुक्त), लोक जनशक्ती पार्टी (रामविलास), हिंदुस्थानी अवाम मोर्चा आणि राष्ट्रीय लोक मोर्चा या पाच एनडीए घटक पक्षांचे सर्व 202 नवनिर्वाचित आमदार या बैठकीला उपस्थित राहून आघाडीचा नेता निवडतील.

**<u>अटक</u>**

सक्तवसुली संचालनालयानं अल फलाह समूहाचे अध्यक्ष जवाद अहमद सिद्दीकी यांना आर्थिक अफरातफर प्रतिबंधक कायद्याअंतर्गत अटक केली आहे. एका वर्तमान प्रकरणाच्या चौकशीत अल फलाह समूहाच्या परिसरात केलेल्या शोध कारवाईदरम्यान गोळा झालेल्या पुराव्यांचे सविस्तर तपास आणि विश्लेषण केल्यानंतर ही अटक करण्यात आली.

**<u>मूकबधीर-ऑलिंपिक्स</u>**

टोकियोमध्ये सुरु असलेल्या 25 व्या डेफलिंपिक म्हणजे मूकबधीरांच्या ऑलिंपिक्समध्ये भारतीय नेमबाजांनी काल 10 मीटर एअर रायफल मिश्र सांघिक स्पर्धेत सुवर्ण आणि कास्यपदक जिंकून दुहेरी कामगिरी केली. धनुष श्रीकांत आणि महित संधू यांच्या जोडीनं सुवर्णपदकाच्या सामन्यात दक्षिण कोरियाच्या जोडीचा 17-7 असा पराभव केला. तर मोहम्मद वानिया आणि कोमल वाघमारे यांच्या जोडीनं युक्रेनियन जोडीचा 16-12 असा पराभव करून कांस्यपदक जिंकलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.